# जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

सरदार वल्लभभाई पटेल टॉवर,प्रशासकीय इमारत,महात्मा गांधी रोड,नेहरु चौक,जळगांव-४२५००१
फोन : २२२२२६१ ते ६५ email:jcmcjalgaon@gmail.com

## तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने पदभरतीची जाहिरात

जळगांव शहर महानगरपालिकेत विविध संवर्गातील पदे तात्पुरत्या स्वरुपात करारपध्दतीने ६ महिन्याच्या हंगामी कालावधीसाठी (१७९ दिवसांकरीता) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत.

सदरील पदभरती संदर्भात जाहिरात,अर्जाचा नमुना,पदांची संख्या,आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता, अनुभव, नियम, अटी व शर्ती इ. जळगांव शहर महानगरपालिकेच्या www.jcmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तरी विहित अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक व पात्र उमेदवारांनी महानगरपालिकेच्या संकेतस्थळाला भेट देवून जाहिरातीतील तपशील विचारात घेवून विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह जळगाव शहर महानगरपालिका, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकिय इमारत, आस्थापना विभाग १० वा मजला 'अ' विंग येथे विहीत मुदतीत समक्ष सादर करावेत.

(डॉ. विद्या गायकवाड)
**आयुक्त**
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

# जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

सरदार वल्लभभाई पटेल टॉवर,प्रशासकीय इमारत,
महात्मा गांधी रोड,नेहरु चौक,जळगांव-४२५००१ फोन : २२२२२६१ ते ६५ email:jcmcjalgaon@gmail.com

संदर्भ क्र./ज.श.म.पा./ आस्था/१५७१०/२०२३-२४ दिनांक :२०/०९/२०२३

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव अंतर्गत खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने ६ महिन्याच्या हंगामी कालावधीसाठी मानधन तत्वावर खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

## तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने भरावयाच्या पदांचा तपशील

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या | किमान शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता (बांधकाम) | १० | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब) मराठी भाषेसह शालांत परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. | २२,०००/- |
| २. | कनिष्ठ अभियंता (पाणी पुरवठा) | ०३ | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी (Mechineal) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब) मराठी भाषेसह शालांत परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. | २२,०००/- |
| ३. | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | ०४ | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विद्युत (Electrical) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब) मराठी भाषेसह शालांत परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. | २२,०००/- |
| ४. | रचना सहाय्यक | ०४ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वास्तुविशारद पदवी (B.Arch) किंवा स्थापत्य अभियांत्रिकी (B.E.Civil/B.Tech.Civil) शाखेची पदवी.<br>ब) मराठी भाषेसह शालांत परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. | २२,०००/- |
| ५. | आरेखक | ०२ | अ) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा आरेखक कोर्स उत्तीर्ण आवश्यक.<br>किंवा<br>अ) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे १ वर्षाचा NCVT कोर्स उत्तीर्ण आवश्यक.<br>ब) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण. | २२,०००/- |
| ६. | अग्निशमन फायरमन | १५ | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>ब) राष्ट्रीय / राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम धारणे आवश्यक.<br>क) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. | २१,०००/- |
| ७. | विजतंत्री | ०६ | अ) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा विजतंत्री कोर्स उत्तीर्ण आवश्यक. (लागतचे ३ वर्ष)<br>किंवा<br>अ) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे १ वर्षाचा NCVT कोर्स उत्तीर्ण आवश्यक.<br>ब) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. | २१,०००/- |
| ८. | वायरमन | १२ | अ) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा तारतंत्री कोर्स उत्तीर्ण आवश्यक.<br>किंवा<br>अ) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे १ वर्षाचा NCVT कोर्स उत्तीर्ण आवश्यक.<br>ब) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. | २१,०००/- |
| ९. | आरोग्य निरीक्षक | १० | अ) महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त संस्थेतून स्वच्छता निरीक्षक कोर्स उत्तीर्ण आवश्यक.<br>ब) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण.<br>क) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. | २१,०००/- |

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या | किमान शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १०. | टायपिस्ट / संगणक चालक | [illegible] | [illegible] | २२,०००/- |
| | एकुण पदे | ८६ | | |

उपरोक्त पदासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांनी आपले अर्ज व प्रमाणपत्राच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रतीसह ऑफलाईन पध्दतीने समक्ष सादर करावयाचे आहे.

**वयोमर्यादा :- किमान वयोमर्यादा :** सर्व प्रवर्ग - १८ वर्षे
**कमाल वयोमर्यादा :-** खुला प्रवर्ग - ३८ वर्षे
सर्व राखीव प्रवर्ग - ४३ वर्षे ( इमाव, अ.ज., अ.जा., भज, विज, विमाप्र)

| | |
|---|---|
| अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :- | आस्थापना विभाग, प्रशासकिय इमारत १० वा मजला सरदार वल्लभभाई पटेल टॉवर, महात्मा गांधी रोड, नेहरु चौक, जळगाव- ४२५००१ |
| अर्ज स्विकारण्याची मुदत :- | दिनांक ०३ / १० /२०२३ ते दिनांक २०/१०/२०२३ (सुट्टीचे दिवस वगळून) |
| वेळ :- | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत |

टिप :- **दिनांक २०/१०/२०२३ रोजी संध्याकाळी ५.३० नंतर कोणत्याही परिस्थीतीत कुणाचेही अर्ज स्विकारले जाणार नाहीत. भरती प्रक्रिया ऑफलाईन पध्दतीने असल्याने ई-मेलद्वारे प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.**

**★ अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१) शैक्षणिक गुणपत्रक व प्रमाणपत्र सांक्षाकित सत्यप्रत.
२) वयासाठी पुरावा – (जन्म प्रमाणपत्र) शाळा सोडल्याच्या दाखला / एस.एस.सी. बोर्ड सर्टीफिकेटच्या सांक्षाकित सत्यप्रत.
३) रहिवास पुरावा – आधारकार्डची सांक्षाकित सत्यप्रत.
४) अनुभव दाखल्याच्या सांक्षाकित सत्यप्रत.
५) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या सांक्षाकित सत्यप्रत.
६) उमेदवाराचा नजीकच्या काळातील २ रंगीत फोटो (रुंदी ३.५ सेमी व उंची ४.५ सेमी आकाराचे)

## स्वयंमुल्यांकन गुणतालिका

| | | |
|---|---|---|
| अ) | किमान शैक्षणिक अर्हता | ५० गुण |
| ब) | अनुभव | १० गुण |
| क) | स्थानिक रहिवाशी | १० गुण |
| ड) | अतिरिक्त शैक्षणिक अर्हता | १० गुण |
| इ) | मौखिक चाचणी | २० गुण |
| | एकुण | **१०० गुण** |

स्वयंमुल्यांकन करतांना अर्जदाराने खालील तक्त्यावरुन त्याला किमान शैक्षणिक अर्हता परिक्षेत प्राप्त गुणांच्या टक्केवारीनुसार त्या-त्या गटासाठी निर्धारित केलेले गुण नमुद करावेत,तसेच अनुभव अर्हता,रहिवास व अतिरिक्त शैक्षणिक अर्हता इ.साठी गटनिहाय निश्चित केलेले गुण विचारात घेवून आपण कोणत्या गटात येतो हे लक्षत घेवून त्या गटासाठी विहीत केलेले गुण नमुद करावेत.

[illegible]

अ) पदाची किमान शैक्षणिक अर्हता गुणभार
(कमाल गुण ५०)

| प्राप्त गुण | विहीत गुण |
|---|---|
| ८० % व त्या पेक्षा जास्त | ५० |
| ७५ % ते ७९ % | ४० |
| ६० % ते ७४% | ३० |
| ५० % ते ५९ % | २० |
| ४० % ते ४९% | १० |
| ० % ते ३९ % | ०० |

ब) अनुभव अर्हता गुणभार
(कमाल गुण १०)

| प्राप्त अनुभव | विहीत गुण |
|---|---|
| ५ वर्षे | १० |
| ३ वर्षे | ०७ |
| १ वर्षे | ०५ |
| ६ महिने | ०३ |
| ६ महिने पेक्षा कमी | ०० |

टिप :- १) ४० % पेक्षा कमी गुण असलेल्या उमेदवारांचे अर्ज भरती प्रक्रियेसाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत.
२) ०.५ अपुर्णांक व त्यापुढील अपुर्णांकातील हे गुण पुढील लगत पुर्णांकात रुपांतरीत करुन गणला जाईल.
३) ०.५ पेक्षा लहान अपुर्णांकाची गणना करण्यात येणार नाही.
४) केवळ शासकीय,निमशासकीय संस्थाकडील अनुभव प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल इतर अनुभव प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.

क) रहिवास कमाल गुण - १०

| तपशिल | विहीत गुण |
|---|---|
| अ) जळगांव शहरवासीय | १० |
| ब) जळगांव तालुका वासीय | ७ |
| क) जळगांव तालुका व्यतिरिक्त इतर तालुका जळगांव जिल्हा रहिवासी | ५ |
| ड) परजिल्हा रहिवासी | २ |

(रहिवास या घटकासाठीचे गुण मिळणेकामी आधारकार्ड वरील रहिवास पत्ता ग्राह्य धरला जाईल अन्य पुरावा ग्राह्य अगर प्रमाण मानणेत येणार नाही.)

ड) अतिरिक्त शैक्षणिक अर्हता - १०

| तपशिल | विहीत गुण |
|---|---|
| अ)पदव्युत्तर पदवी | १० |
| ब) पदव्युत्तर पदविका | ५ |

(पदव्युत्तर पदविका व पदव्युत्तर पदवी ही पदवी घेतलेल्या विषयातीच ग्राह्य धरणेत येईल. तसेच पदव्युत्तर पदविका व पदव्युत्तर पदवी दोन्ही असल्यास पदव्युत्तर पदवीच ग्राह्य धरण्यात येईल.)

**इ) मौखिक चाचणी कमाल गुण — २०**

१. मौखिक चाचणीचे वेळापत्रक कार्यक्रम अर्ज सादर करणेच्या अंतिम दिनांकापासुन ०७ दिवसाचे आत म.न.पा.संकेतस्थळावर व वृत्तपत्रातुन प्रसिध्द करणेत येईल.

२. मौखिक चाचणीत कर्मचारी निवड समितीच्या सर्व सदस्यांनी दिलेल्या गुणांची सरासरी काढून उमेदवारास गुण देणेत येतील.

३. मौखिक चाचणीत (१) विषयज्ञान (२) दृष्टीकोन (३) शारिरीक क्षमता (fitness) (४) कर्तव्यनिष्ठा (५) आज्ञाधारकपणा इ.घटकांची तपासणी करणेचे हेतूने चाचणी घेतली जाईल.

**अटी व शर्ती :-**

१. सदरहू पदे तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने ६ महिने (१७९ दिवसासाठी) हंगामी कालावधीसाठी असून कराराध्दतीने अस्तित्वात राहतील. तसेच नियुक्तीच्या कालावधीमध्ये उमेदवाराचे काम समाधानकारक न आढळल्यास तसेच कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणूक केल्यास कोणतेही कारण न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२. सदरची पदे ही ६ महिने (१७९ दिवस) तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने हंगामी कालावधीसाठी असल्याने निवड होणाऱ्या उमेदवारास जळगांव शहर महानगरपालिका आस्थापनेवरील कोणत्याही पदावर कायम नियुक्तीसाठी दावा सांगता येणार नाही अगर त्याकामी कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

३. जाहिरातीमधील पदसंख्या, यामध्ये बदल होऊ शकतो त्यामध्ये वाढ / घट करण्याचे अधिकार, तसेच विहित केलेला थेट मुलाखतीचा दिनांक व वेळ, ठिकाण इत्यादीमध्ये कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांना राहतील.

४. जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव क्षेत्रातील नेमून दिलेल्या कोणत्याही विभागात (संवर्गानिहाय) काम करणे बंधनकारक राहील. तसेच महानगरपालिका प्रशासनाकडुन वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचनांप्रमाणे कामे करणे बंधनकारक राहील.

५. उमेदवार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या घटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुद्ध पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे. तसेच पोलिस विभागाचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र व जिल्हाशल्य चिकित्सक यांचे कडील शारिरीक सक्षमता (fitness) / वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

६. निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास त्याचे नियुक्तीची आवश्यकता न वाटल्यास किंवा शिस्तभंग केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.

७. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

८. निवड झालेल्या उमेदवारांस रुपये १००/- किंवा विधी आकाराप्रमाणे (वेतन मिळकतीनुसार) बॉन्ड पेपरवर विहित नमुन्यातील तात्पुरत्या स्वरुपात करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.

९. कुठल्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने ८ दिवसांची लेखी पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

१०. सर्वदृष्टीने परिपूर्ण कागदपत्रांसह सादर केलेलेच अर्ज ग्राह्य धरण्यात येतील. अपुर्ण,चुकीची माहिती असलले अर्ज बाद करणेत येतील.

११. तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने भरती पदाकरीता नियुक्त होणा-या उमेदवारांना महानगरपलिकेची सेवा नियमावली व इतर कुटल्याही प्रकारचे लाभ लागू होणार नाहीत.

१२. उमेदवारांने एकापेक्षा जास्त पदाकरीता अर्ज सादर करायचा असल्यास, प्रत्येक पदाकरीता स्वंतत्रपणे अर्ज सादर करावा. अर्जासोबत पदांचा प्राधान्यक्रम मुलाखतीचे पूर्वी कार्यालयास सादर करावा, परंतु वेळप्रसंगी एकाच वेळी मुलाखत परिक्षा घेतली गेल्यास कोणत्या तरी एका पदाकरीता उपस्थित रहावे लागेल, ज्यास उपस्थित राहील त्या पदाकरीता संबंधित उमेदवार ग्राहय धरून, दुसऱ्या पदाकरीता गैरहजर ग्राहय धरण्यात येईल.

१३. निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल. उपरोक्त पदांकरिता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवून गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. तात्पुरत्या कर्मचारी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१४. सवर्ग पदांकरिता उमेदवारांनी अर्ज सादर करताना प्रथम विहित नमुन्यात अर्ज. इ.१० वी गुणपत्रक आणि सनद जन्म तारीख पुरावा म्हणून), १२ वी गुणपत्रक आणि पदवीचे गुणपत्रक पदवी प्रमाणपत्र (Convocation

(Certificate), ज्या त्या शैक्षणिक अर्हतेस संबंधित परिषदेकडील नोंदणी लागू आहे, त्या त्या शैक्षणिक अर्हतेची वैध असलेली परिषदेकडील नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणून (शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) व इतर आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकित/स्वसाक्षांकित करून जोडावीत. अर्ज सादर केल्याची पोहोच घेणेकरिता अर्जाची वरील पृष्ठभागाची झेरॉक्स घेऊन येणे. नावात बदल असल्यास राजपत्र / विवाह नोंदणी आणि नोटराईज्ड ॲफिडेव्हिट जोडणे बंधनकारक राहील.

१५. उमेदवारांनी वर नमूद केलेल्या कालावधीमध्ये, कार्यालयीन दिवशी, दिलेल्या वेळेत व्यक्तीशः उपस्थित राहून अर्ज सादर करण्यात यावेत. नमूद मुदती अगोदर अथवा मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरूपाची तक्रार अथवा कोणताही दबाव आणण्याचा प्रयत्न करू नये.

१६. उमेदवारांची नियुक्ती पूर्वी त्यांचे अर्जाशी निगडीत सर्व मूळ कागदपत्रांची पडताळणी (Document Verification) करण्यात येईल. त्यावेळी उमेदवारांनी सदर मूळ (Original) कागदपत्र, जाहिरातीसोबत जोडलेले लहान कुटुंबाबाबतचे प्रपत्र नमुना-अ मध्ये इ. कागदपत्र पडताळणी समितीसमोर सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१७. गुणांकन केल्यावर गुणानुक्रमानुसार अधिकतम गुण मिळालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी संकेतस्थळावर व नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.

१८. निवड प्रक्रियेतील पात्र / अपात्र उमेदवारांची यादी, भरती प्रक्रियेची माहिती जळगांव शहर महानगरपालिकेच्या www.jcmc.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येईल. याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवार सोबत केला जाणार नाही.

१९. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील आणि विहीत करारनामा करने बंधनकारक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश आपोआप संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

२०. सदरची भरतीची प्रक्रिया पूर्ण झालेनंतर भविष्यात जर एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीतील मेरिटमधील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील. सदर अंतिम निवड यादी ही तयार झालेनंतर वेबसाइटवर प्रसिध्द झालेनंतर पुढील सहा महिन्या (१७९ दिवस) पर्यंत वैध राहील.

२१. अर्जदाराने जाहिरातीत नमूद केलेनुसार त्या-त्या घटकासाठी विहीत केलेले गुण विचारात घेवून अर्जात स्वयंमुल्याकनाचे गुण अचूकरित्या नमूद करावेत.

२२. मौखिक चाचणीसाठी पदनिहाय गुणवत्तायादी नुसार १ : ३ या प्रमाणात उमेदवारांची निवड करणेत येईल.

२३. शैक्षणिक अर्हता,अनुभव अर्हता,रहिवास अर्हता,अतिरीक्त शैक्षणिक अर्हता व मौखिक चाचणी इ.मध्ये प्राप्त गुणांची बेरीज करुन अंतिम गुणवत्ता यादी तयार करणेत येईल व गुणवत्ता यादी नुसार पदांच्या संख्ये इतक्या पहिल्या उमेदवारांची क्रमनिहाय अंतिम निवड करणेत येईल व उर्वरीत उमेदवार हे क्रमनिहाय प्रतिक्षा यादीत असतील

२४. प्राप्त अर्जांची संख्या अधिक असल्यास स्वंयमुल्याकन गुणतक्त्या आधारे विविध घटकासाठी गुण विभागणी गटनिहाय १:३ या प्रमाणात उमेदवार संख्या उपलब्ध होई पावेतो प्राप्त अर्ज विचारात घेतले जातील अगर १:३ या प्रमाणात उमेदवार संख्या उपलब्ध होई पावेतो पदनिहाय गुणवत्ता यादीनुसार पहिल्या उमेदवारानांच मौखिक चाचणीसाठी बोलविले जाईल इतर अर्ज अगर उमेदवारांचा मुलाखतीसाठी विचार केला जाणार नाही.

(डॉ. विद्या गायकवाड)
आयुक्त
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

6...